# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

**२०२२**

गुन्हे शाखा, नवीमुंबई

दिनांक २५.०२.२०२२

**खारघर पोलीस ठाणे हददीत ''ग्रेस फुल टच युनीसेक्स सलुन '' से. ०४ खारघर, जि. रायगड येथे चालणा-या वेश्याव्यवसायावर नवी मुंबई गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिंबध कक्षाकडील पोलीसांनी केली कारवाई**

---------------------------------------------------

दिनांक २४/०२/२०२२ रोजी वपोनि/पराग सोनावणे यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, ग्रेस फुल टच युनीसेक्स सलुन '' से. ०४ खारघर, नवी मुबंई जि. रायगड येथे ग्राहकास वेश्यागमनासाठी मुली/महिला दाखवून वेश्या व्यवसाय करवून घेतला जात असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली मा. अपर पोलीस आयुक्त महेश घुर्ये, पोलीस उप आयुक्त सुरेश मेंगडे, सहा. पोलीस आयुक्त विनायक वस्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदशनाखाली येथे कारवाई करून खारघर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं। ४९/२०२२ भा.द.वि. क ३७० (३), ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम सन- १९५६ चे कलम ३,४,५ अन्वये गुन्हा नोद करण्यात आला आहे.

सदर कारवाई मध्ये **आरोपी १) मनी धनू अधिकारी,** वय ३० वर्षे, रा. रूम नं २४२ प्रिया रेसिडनसी, से. १० खारघर, मो.नं.  मुळ रा. बुटोली, नेपाळ व माझे आधार कार्डवरील पत्ता हा कुष्ण, गुळमंडी, गुडली चौक, दिल्ली, **पाहिजे आरोपी २) मालक झिनत दरवेज शेख उर्फ पुजा पटेल, भागीदार रवि शिवशरण व चंद्राबाबू** हे पिडीत महिलांना ग्राहकास वेश्यागमना करीता दाखवून वेश्यागमन करवून घेत होते. त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

तसेच **सदर गुन्हयातुन एकुण ०३ पिडीत मुलीची सुटका करण्यात आली असुन सदर मुलीकडुन वेश्यागमन करून घेत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पाहिजे आरोपी यांना अटक करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.**

सदर कारवाई मा. अपर पोलीस, आयुक्त महेश घुर्ये, मा. पोलीस उप आयुक्त, सुरेश मेंगडे, सहा. पोलीस आयुक्त, विनायक वस्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदशनाखाली वपोनि/ पराग सोनवणे, मसपोनि/ पाटील, पोउनि भरघुडे, तसेच पोहवा/५२२ शेटये, पोना/ २१०८ चौधरी, पोशि २६५४/ठाकुर, मपोना २५०४/ अडकमोल, मपोना २९८४/भोये, मपोना/१६५१ पोटे यांनी केली आहे.

---------------